# आमचं गाव आमचा विकास

## ८: अंमलबजावणी व संनियंत्रण :

# अंमलबजावणी व संनियंत्रण

1 **तांत्रिक सेवा**:

- सदयस्थितीत पंचायत समिती स्तरावर उपलब्ध असलेल्या तांत्रिक कर्मचाऱ्यांचा नियोजनबद्ध वापर करून ग्रामपंचायतींना आवश्यकते प्रमाणे तांत्रिक सेवा उपलब्ध करून देणे किंवा आवश्यक असल्यास ग्रामपंचायती बाह्य तांत्रिक सेवा उपलब्ध करून घेऊ शकेल व त्याची आवश्यक तरतूद अंदाजपत्रकामध्ये करेल.

2 **संनियंत्रण कार्यपध्दती** :

- ग्रामपंचायत विकास आराखड्याअंतर्गत ग्रामपंचायतीने हाती घेतलेल्या कामांचे आर्थिक, भौतिक संनियंत्रण करणेसाठी खालील पध्दतींचा अवलंब करण्यात येईल.

# अंमलबजावणी व संनियंत्रण

## ३.नियमीत व सातत्यपूर्व आढावा बैठका

| अ.क्र. | समितीचे नाव | करावयाचे कामकाज /आढावा | आढावा नियमितता |
|---|---|---|---|
| 1 | राज्य स्तरीय सनियंत्रण समिती | गाव विकास आराखडे तयार करणे, अंमलबजावणी करणे यासाठी आवश्यक धोरणात्मक निर्णय, योजनेअंतर्गत विविध प्रक्रियांचे मुल्यमापन करेल आणि आवश्यक त्या मार्गदर्शक सूचना व शासन निर्णय निर्गमित करून योजनेच्या अंमलबजावणीस वेग देणे . | सहामाही |
| 2 | राज्यस्तरीय कार्यकारी समिती | अंमल बजावणी व समस्यांचा आढावा | तिमाही |
| 3 | जिल्हा स्तरीय सनियंत्रण समिती | जिल्हा स्तरीय विभागामधील समन्वय व ग्रामपंचायत विकास आराखडयाच्या अंमलबजावणीचा आढावा घेईल. तसेच जिल्ह्यातील ग्रामपंचायतींना येणा-या अडी अडचणीवर उपाययोजना सुचवेल. | सहामाही |
| 4 | जिल्हा स्तरीय कार्यकारी समिती | आराखडे तयार करणे आणि विविध उपक्रमांचा भौतिक व आर्थिक आढावा घेईल. यामध्ये गट विकास अधिकारी व संबंधीत अधिका-यांची दरमहा आढावा बैठक घेऊन विकेंद्रिकरण व नियोजन प्रक्रियेस वेग देईल. | दरमहा |
| 5 | गट विकास अधिकारी | तालुका स्तरावरील सर्व संबंधीत अधिका-यांची आढावा बैठक तसेच महिन्यातून एका बैठकीस ग्रामपंचायतीचे सरपंच व उपसरपंच यांचीही बैठक घेतील. | पंधरवडा |

# अंमलबजावणी व संनियंत्रण

**४.अहवालाची कार्यपद्धती** :

1. प्रत्येक ग्रामपंचायतीने तयार केलेल्या गाव विकास आराखडयातील कामांची नोंदणी प्लान प्लस (Plan Plus) या अज्ञावलीमध्ये करावी. तसेच या नोंदींची पडताळणी/ निरीक्षण गट विकास अधिकारी आणि जिल्हा स्तरावरून सुध्दा करावी.

2. जिल्हा , तालुका, गण व ग्रामपंचायत पातळीवरील अहवालाचे नमुने देण्यात येतील तसेच ऑनलाईन अहवाल सादर करण्यासाठी आवश्यक त्या सुविधा व व्यवस्था करण्यात येईल

३. ग्रामपंचायतीच्या उपसमित्या, सामाजिक लेखापरिक्षण समिती, ग्रामस्तरावरील विविध गट यांचा विविध प्रकल्प अंमलबजावणीबाबतचा आढावा ग्रामपंचायत नियमितपणे घेईल.

# अंमलबजावणी व संनियंत्रण

**४.अहवालाची कार्यपद्धती**

4.कोणत्याही प्रकारच्या सुचना, सुधारणा किंवा त्रुटी या ग्रामपंचायत स्तर, किंवा प्रभागस्तरावर निदर्शनास आल्यास या सुचना, सुधारणा किंवा त्रुटी संबंधीत प्रभारी अधिकारी किंवा ग्रामसेवक गट विकास अधिका–यांच्या निदर्शनास आणतील.गट विकास अधिकारी शक्यतो याबाबी त्यांच्या स्तरावर सोडवतील. गट विकास अधिकारी गरज भासल्यास जिल्हा स्तरावरुन मार्गदर्शन मागवू शकतील.

५.काम पूर्ण होताच त्याची नोंद असेट डिरेक्टरी या आज्ञावलीमध्ये करणे बंधनकारक राहील.

# अंमलबजावणी व संनियंत्रण

**५.निधीची उपलब्धता व संवितरण पध्दती**

1. या कार्यक्रमासाठी ग्रामपंचायतीने स्वनिधी प्राधान्याने उपलब्ध करून द्‍यावयाचा आहे.

2. साहित्य खरेदीसाठी प्रचलीत नियमानुसार आणि ज्या योजने मधील निधी वापरण्यात येणार आहे, त्या योजनेच्या मार्गदर्शक सुचना विचारात घेऊन, ग्रामपंचायतीने निविदा प्रक्रियेचा अवलंब करावा.

3. ग्रामपंचायतीस उपलब्ध निधीचा विनियोग झाल्यानंतरच संबंधीत योजनेअंतर्गतचा पुढील निधी उपलब्ध होईल

# अंमलबजावणी व संनियंत्रण

**लोकसहभाग**

1. **सामाजिक लेखापरिक्षण**

- ग्रामपंचायत विकास आराखड्यातील कामांची पाहणी, गुणवत्ता नियंत्रण व मूल्यमापनासाठी ग्रामसभा सामाजिक लेखा परिक्षण समिती स्थापन करेल.
- या समितीमध्ये 12 ते 24 सदस्य असावेत. त्यामध्ये अनु. जाती/ जमाती व सर्व प्रवर्गांतील महिलांना योग्य प्रमाणात प्रतिनिधीत्व देण्यात यावे.
- तसेच वेगवेगळया क्षेत्रातील जाणकार लोकांना व तज्ञांना सामावून घेण्यात यावे.

# अंमलबजावणी व संनियंत्रण

**लोकसहभाग**

1. **सामाजिक लेखापरिक्षण**

- विविध क्षेत्रातील ज्यांनी चांगल्याप्रकारे निस्पृहपणे, समाजसेवा म्हणून काम केले असेल अशा सेवा निवृत्तांना व माहितगार व्यक्तींना प्राधान्यक्रमीने प्रतिनिधीत्व देण्यात यावे.
- जेणेकरून सामाजिक परिक्षण करताना व संनियंत्रण करताना योग्यप्रकारे, समाजहिताच्या दृष्टिकोनातून ग्रामपंचायत विकास आराखडयाची अंमलबजावणी करता येईल.
- सदर समिती दर तिमाहीस एकदा याप्रमाणे वर्षातून चार वेळा योजना अंमलबजावणीबाबत सामाजिक लेखापरिक्षण करेल, व
- त्याचा अहवाल ग्रामपंचायत व ग्रामसभेस सादर करेल

# अंमलबजावणी व संनियंत्रण

2. **कार्यगट**

- गावातील सेवानिवृत्त तांत्रिक तज्ञ,
- विविध खात्यामधून निवृत्त झालेले अनुभवी व्यक्ती,
- बचतगट, युवकमंच, युवक मंडळे यांचा समावेश असलेला एक कार्यगट ग्रामसभा स्थापन करेल व
- तो ग्रामपंचायत विकास आराखड्याच्या अंमलबजावणीबाबत नियमितपणे सूचना देऊन पाठपुरावा करेल.

# अंमलबजावणी व संनियंत्रण

6 **लेखे, लेखांकन पध्दती व लेखापरिक्षण** :

- ग्रामपंचायत विकास आराखडयासाठी विविध स्त्रोतामधून निधी उपलब्ध होत असल्यामूळे, ग्रामपंचायतीस ज्या स्त्रोतामधून/ योजनेमधून निधी उपलब्ध होत आहे त्या स्त्रोतासाठी/योजनेसाठी लागू असलेले लेखे, लेखांकन, लेखापरिक्षण पद्धती आणि मार्गदर्शक सुचना नुसार ग्रामपंचायतीने कार्यवाही करावयाची आहे

# अंमलबजावणी व संनियंत्रण

**७.उपयोगिता प्रमाणपत्र व पूर्णत्वाचे दाखले** :

- 1. ग्रामसभेने मंजूर केलल्या ग्रामपंचायत विकास आराखडयातील प्रकल्प/उपक्रमावर ग्रामपंचायत खर्च करून, सदरचा प्रकल्प/उपक्रम विहित मुदतीत पुर्ण करेल. त्यासाठी ग्रामपंचायतीला उपलब्ध असलेला व ग्रामपंचायत विकास आराखडयातील मंजूरीप्रमाणे निधी खर्च करून त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र ऑनलाईन प्लॅन प्लसदवारे वेळीच पाठवेल. ग्रामपंचायतीला ज्या योजनेमधून निधी उपलब्ध होईल, त्या योजनेच्या मार्गदर्शक सुचनानुसार उपयोगिता प्रमाणपत्र विहित नमून्यात ग्रामपंचायत सादर करेल.

# अंमलबजावणी व संनियंत्रण

**७.उपयोगिता प्रमाणपत्र व पूर्णत्वाचे दाखले** :

- 2. ग्रामपंचायतीने हाती घेतलेली प्रकल्प/कामे विहित मुदतीत पुर्ण करून प्रत्येक प्रकल्प/कामाचा पुर्णत्वाचा दाखला संबंधीत तांत्रिक अधिका–याकडून प्राप्त करून घेऊन ग्रामपंचायत तो ऑनलाईन भरून पाठवेल.